विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडून वितरीत केल्या जाणाऱ्या अनुदानाचे आहरण व वितरण करण्याकरिता नियंत्रक अधिकारी घोषित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग
शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.३९/ अर्थसंकल्प
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक :- ४ एप्रिल, २०१८

वाचा :- १) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र.शाकानि-२०१७/प्र.क्र.३३/१८(र. व का.), दि.०९ मार्च २०१७.
२) शासन निर्णय, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाचे क्र.बीजीटी -२०१७/प्र.क्र.६/प्र.क्र.३६/अर्थसंकल्प, दि.२३ ऑक्टोबर, २०१७.

प्रस्तावना :-

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.१ च्या अधिसूचने अन्वये विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाची स्थापना करण्यात आली आहे. सदरहू नवनिर्मित विभागाकरिता संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये स्वतंत्र लेखाशीर्ष व सांकेतांक घेण्यात आलेले आहेत. सन २०१८-१९ या वित्तीय वर्षापासून या विभागासाठी "झेडजी- विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग" अंतर्गत स्वतंत्र अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आलेली आहे. सदरहू तरतूद अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरीत करण्यासाठी नियंत्रक अधिकारी घोषित करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सन २०१८-१९ या वित्तीय वर्षापासून या विभागासाठी "झेडजी- विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग" अंतर्गत उपलब्ध होणारी तरतूद, अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरीत करण्यासाठी, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग (खुद्द) करिता श्री.भा.र. गावित, सह सचिव (अर्थसंकल्प) तसेच, विभागाच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयांकरिता श्री. शरद लक्ष्मण अहिरे, संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०४०६११०९५५२७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

S. A. Pedgaonkar

Digitally signed by S. A. Pedgaonkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b2ac85a22a7c244beaad68d7bf50398b67204dc905155ddd4219e64a8ba0c058, cn=S. A. Pedgaonkar
Date: 2018.04.06 11:12:20 +05'30'

(सु.अ. पेडगावकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा) १ व २, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
४. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई
५. सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे
७. सह सचिव (अर्थसंकल्प), विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सर्व अवर सचिव/ कक्ष अधिकारी, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. निवडनस्ती